CMYK

अटल भूजल योजना राज्यातील सर्व जिल्ह्यात राबविण्यासाठी केंद्राकडे पाठपुरावा करणार >> पान 2

विमुक्त जातीतील बोगस राजपूत भामटा यांची अवैध घुसखोरी थांबवा >> पान 3

शेतकरी मित्र दिलीप चौधरी व शेतकरी योद्धा बालाजी सोसे ३० सप्टेंबरला करणार आत्मदहन >> पान 4

**सुविचार**

मनुष्याचे मोठेपण हे त्याच्या वयावर नव्हे, तर कर्तृत्वावर अवलंबून असते.

# दैनिक आपला विदर्भ

अनुष्का शर्माच्या बहिणीच्या इंटीमेट सीनने इंटरनेवर राडा

आतील पान



apalavidarbhlivenews@gmail.com

मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 03 रे ■ अंक 34 ■ मंगळवार, दि. 10 सप्टेंबर 2024 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006

# वीज कर्मचाऱ्यांना 'बाप्पा' पावला

## वेतनात घसघशीत वाढ; इतर राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्रात सर्वाधिक वेतन



दैनिक आपला विदर्भ

**मुंबई : वीज कर्मचाऱ्यांसाठी खूशखबर आहे. राज्य सरकारने महाराष्ट्र महावितरण व महापारेषण या कंपन्यातील कर्मचाऱ्यांच्या पगारवाढीची घोषणा केली. कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या मूळ वेतनात १९ टक्क्याने वाढ केली जाणार आहे. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मोठा निर्णय तीन्ही वीज कंपनीतील कंत्राटी कामगारांना १९% वेतन वाढ मिळाली आहे. आता महाराष्ट्रात इतर राज्यांच्या तुलनेत सर्वाधिक वेतनवाढ देण्यात आलेली आहे.**



या निर्णयाचा लाभ कर्मचारी, अभियंते, अधिकारी आणि सहाय्यक प्रवर्गातील कामगारांना होणार आहे. या कर्मचाऱ्यांच्या पगारवाढ मार्च २०२४ पासून ही वाढ लागू होणार आहे. पहिली पगारवाढ सुद्धा देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री असताना झाली होती. आरोग्यासाठी महात्मा फुले जनआरोग्य योजनेत 'टॉप अप' करून वेगळी योजना तयार करण्याचे आदेश दिले आहे. वीज कर्मचाऱ्यांच्या वेतनवाढीसंदर्भात आज एक बैठक पार पडली. या बैठकीला सुधीर मुनगंटीवार, चंद्रशेखर बावनकुळे, आशिष देशमुख उपस्थितीत, धनंजय मुंडे देखील ऑनलाईन उपस्थित होते.

ऊर्जा विभागाच्या अधिपत्याखाली असलेल्या महावितरण, महानिर्मिती आणि महापारेषण या वीज कंपन्यांतील कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या मूळ वेतनात १९ टक्के वाढ करण्यात आली आहे. सह्याद्री अतिथीगृह येथे ऊर्जा विभागाच्या अधिपत्याखाली महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित या वीज कंपन्यांतील अधिकारी आणि कर्मचारी यांच्या वेतन पुनर्निर्धारण करण्याबाबत बैठकीत देवेंद्र फडणवीसांनी याची माहिती दिली.



# 'शरद पवार धनगर समाजाचे जगातील सर्वात मोठे शत्रू'

## धनगर नेत्याने डागली तोफ, मनोज जरांगेंवरही टीकास्त्र

दैनिक आपला विदर्भ

**पंढरपूर/प्रतिनिधी** : शरद पवार यांनी मला उपोषणाला उठवून बसवले हा आरोप धादांत खोटा असून मी त्यांचा समर्थक नाही. शरद पवार हे धनगर समाजाचे जगातील सर्वात मोठे शत्रू आहेत. आमच्या वाटणीचा सोन्याचा डोंगर जो प्रस्थापित व्यवस्थेने पळविला त्यातील धनगर समाजाच्या न्याय हक्काचे सर्वात मोठे दरोडेखोर शरद पवार आहेत, अशी सडकून टीका धनगर समाजाचे नेते पांडुरंग मिरगळ यांनी केली. आजपासून पंढरपूर येथे राज्यातील सकल धनगर समाजाकडून आमरण उपोषणाला सुरुवात होत असून यासाठी पांडुरंग मिरगळ व इतर धनगर समाजाचे पदाधिकारी उपस्थित होते.

एबीपी माझाशी संवाद साधताना मिरगळ यांनी सताधारी आणि मराठा आंदोलक मनोज जरांगे यांच्यावर देखील सडकून टीका केली. फाटकी पत्रावळ पळवून नेण्यासाठी मनोज जरांगे यांनी वर्षभर ताकद लावली. आमचे आहे ते लुटून न्यायला लागलाय आणि तुम्ही आम्हाला धनगरांना अनुसूचित जमातीतून आरक्षण देण्याची भाषा करता असल्या भूलथापा द्यायची गरज नसल्याचे म्हणत जरांगे यांच्यावार त्यांनी टीका केली.

तुम्ही खूप ताकदवान नेता आहे म्हणता आणि मुख्यमंत्री तुमचा >> पान २

# अमित शहांच्या आधी शरद पवारांनी घेतले लालबागच्या राजाचे दर्शन

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी** : राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे अध्यक्ष शरद पवार यांनी लालबागच्या राजाचे दर्शन घेतले आहे. शरद पवार यांनी लालबागच्या राजाचे दर्शन घेतल्याने राजकीय वर्तुळात चर्चेला उधाण आले आहे. शरद पवार फारसे देव दर्शनाला जात नाहीत. पण देशात सध्या आक्रमक हिंदुत्वाची राजकीय पेरणी केली जात आहे. या राजकीय आणि सामाजिक मशागतीत सर्वच राजकीय पक्ष आणि त्यांचे नेते कमी अधिक प्रमाणात एकत्र भरडून तरी जात आहेत, किंवा या राजकारणात सहभागी तरी होत आहेत. आज दुपारी १२ वाजता केंद्रीय गृह मंत्री अमित शहा लालबागच्या राजाच्या दर्शनाला येत आहेत. त्यापूर्वीच शरद पवार यांनी लालबागच्या राजाचे दर्शन घेतले आहे.

राष्ट्रवादी शरद पवार गटाचे अध्यक्ष शरद पवार हे मुख्यमंत्री असताना एकदा लालबागच्या राज्याच्या दर्शनाला आले होते. त्यानंतर आता त्यांनी अनेक वर्षानंतर आज लालबागच्या राजाचे दर्शन घेतले आहे. कोरोना काळात रक्तदान शिबिराचे आयोजन लालबागचा राजा सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाने केले होते, त्यावेळी देखील शरद पवार आले होते. मात्र, त्यावर्षी गणपतीची स्थापना करण्यात आली नव्हती. फक्त रक्तदान शिबिराचे आयोजन केले होते.

केंद्रीय गृहमंत्री अमित शाह हे महाराष्ट्र दौऱ्यावर आहेत. ते आज दुपारी १२ वाजता लालबागच्या राजाचे दर्शन घेणार आहेत. मात्र त्यापूर्वी आज शरद पवार यांनी लालबागच्या राजाचे दर्शन घेतल्याने राजकीय वर्तुळात चर्चेला उधाण आले आहे.

# फडणवीसांनी मराठ्यांना आरक्षण द्यावे, मी पुढे एक शब्दही बोलणार नाही : मनोज जरांगे

दैनिक आपला विदर्भ

**बीड/प्रतिनिधी** : फडणवीस साहेबांनी फक्त गेसोयऱ्यांची मागणी मान्य करावी आणि मराठ्यांना आरक्षण द्यावं, मी त्यापुढे राजकारणावर एक शब्दही बोलणार नाही असं मनोज जरांगे यांनी म्हटलं. फडणवीसांनी आपल्याविरोधात मराठा आमदार उभे केलेत, त्यांनी जर आरक्षण दिलं नाही तर त्यांना राजकारणात लोळवल्याशिवाय मराठा समाज मागे हटणार नाही असा इशाराही मनोज जरांगे यांनी दिला. बीडमध्ये झालेल्या घोंगडी बैठकीमध्ये मनोज जरांगे यांनी हे वक्तव्य केले.



मराठ्यांनी तुमचे काय वाईट केले?

देवेंद्र फडणवीसांवर टीका करताना मनोज जरांगे म्हणाले की, तुम्हाला गरिबांची मुले मोठी व्हावेत असे का वाटत नाही? या सरकारमधील मंर्त्यांना गरिबांची पोरे मोठी होऊ नयेत असे का वाटते? तुम्हाला फक्त तुमचा पक्ष आणि नेते मोठे करायचे आहेत. देवेंद्र फडणवीस, मराठ्याच्या म ुलांनी तुमचे काय वाकडे केले? मराठ्यांचे आमदार मराठ्यांच्या विरोधात उभे केले. कुठे केसेस करत आहे, कुठे मराठ्यांचे आमदार विरोधात उभे करता. फडणवीस साहेब तुम्हाला लोळवल्याशिवाय आता मराठा समाज मागे हटत नाही. जर तुम्ही आरक्षण दिले नाही तर आम्हाला सत्ता काबीज करावी लागणार. मराठा समाज्याच्या आरक्षणासाठी वाटेल ते करेन.

देवेंद्र फडणवीस साहेब, मी राजकारणाचा एक शब्द काढत नाही, तुम्ही फक्त आरक्षण द्या. मी पुन्हा यावर बोलणार नाही. तुम्ही आरक्षण दिलं नाही तर मग मी राजकीय बोलणार असा इशाराही मनोज जरांगे यांनी दिला. >> पान २

# पुण्यातील मानाच्या गणपती बाप्पाचे दर्शन घेऊन राज्यातील अरीष्ट टाळण्यासाठी उपसभापती, शिवसेना नेत्या डॉ. नीलमताई गोऱ्हे यांची गणरायाकडे प्रार्थना

दैनिक आपला विदर्भ

■ उदय नरे

**पुणे** : गणेश चतुर्थीच्या शुभमुहूर्तावर घराघरात तसेच गणेश मंडळाच्या सभामंडपात वाजत गाजत थाटामाटात आपल्या लाडक्या विघ्नहर्त्याचे आगमन झाले आहे. विद्येचे माहेरघर असलेल्या पुणे शहरातील गणेशोत्सवाची धुम काही औरच असते. राज्यभरातील लाखो गणेश भक्त पुण्यात बाप्पाच्या दर्शनाला येतात. भाद्रपद चतुर्थीला गणरायाची प्राणप्रतिष्ठा केली जाते तर पुढील दहा दिवस मनोभावे पूजाअर्चना केली जाते. सार्वजनिक गणेशोत्सव साजरा करण्यात गणेश मंडळात तर अनोखी उत्साहऊर्जा संचारते.

सार्वजनिक गणेशोत्सवातून सामाजिक एकोपा, राष्ट्रिय एकात्मता, सर्वधर्म समभाव राखून हिंदू संस्कृती व परंपरेचे रक्षण केले जाते. मोठ्या हर्षोल्लाहासाने विविध प्रकारच्या आकर्षक सजावट व नयन मनोहर देखावे सादर करून लाडक्या बाप्पाची आणि स्थापना केली जाते व पुढील दहा दिवस संस्कृती व परंपरेचे रक्षण केले जाते. महाराष्ट्र विधान परिषदेच्या उपसभापती, शिवसेना नेत्या डॉँ नीलमताई गोऱ्हे यांनी पुणे शहरातील मानाच्या गणपती बाप्पाचे दर्शन घेतले. कसबा गणपती, दगडुशेठ गणपती, तांबडे जोगेश्र्वरी, गुरुजी तालीम, तुळशी बाग मंडई गणपती, केसरी वाडा. येथील गणरायाचे दर्शन घेऊन मनोभावे पुजा केली.

राज्यातील दृष्काळाची छाया नष्ट होऊन सुखसमृद्धी लाभावी, बळीराजा संतुष्ट होऊन राज्यातील सर्व प्रकारचे अरिष्ट टळावे. महाराष्ट्र राज्याला प्रगतीपथावर नेण्यासाठी लोकाभिमुख व जनसामान्यांचे नेते मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली पुन्हा एकदा महायुतीचे सरकार यावे अशी प्रार्थना उपसभापती, शिवसेना नेत्या डॉक्टर नीलमताई गोऱ्हे



यांनी गणरायाकडे केली. यावेळी दर्शना त्रिगुणाईत सहसंपर्क प्रमुख , सारिका पवार , मनिषा पारंडे जिल्हा प्रमुख, विभाग प्रमुख संजिवनी विजापूरकर विभाग प्रमुख, श्रृती राजरकर, जयश्री मोरे उपशहर प्रमुख तसेच शिवसेना भवन कार्यालय प्रमुख श्री सुधीर जोशी उपस्थीत होते.





# विधानसभेच्या जागावाटपाबाबत अमित शाहांचा एकनाथ शिंदे, अजितदादांना शब्द

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी** : भाजप नेते आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह दोन दिवसांच्या मुंबई दौऱ्यावर होते. मुंबई दौऱ्याचा समारोप होण्यापूर्वी अमित शाह यांनी मुंबई विमानतळावर महायुतीच्या नेत्यांची बैठक घेतली. या बैठकीला राष्ट्रवादी काँग्रेसकडून अजित पवार, प्रफुल पटेल आणि प्रदेशाध्यक्ष सुनिल तटकरे उपस्थित होते. महाराष्ट्र भाजपकडून देवेंद्र फडणवीस आणि शिवसेनेकडून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे या बैठकीला उपस्थित होते. या बैठकीत आगामी विधानसभा निवडणुकीबाबत महायुतीमधील मित्र पक्षांच्या नेत्यांना जागावाटपात सन्मानजनक जागा देण्याचा शब्द दिला आहे, असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे.

अमित शाह यांनी महायुतीच्या जागा वाटपामध्ये प्रत्येकाचा सन्मान राखला जाईल याची खात्री दिली. महायुतीतील इतर घटक पक्षांच्या नेत्यांना अमित शाह यांनी जागा वाटपाबाबत शब्द दिला आहे. याशिवाय ज्या जागा निवडून येतील त्याचा लवकरात लवकर आढावा घेऊन एकत्रित बैठक करण्याच्या सूचना देखील अमित शाह यांनी दिल्या आहेत.



महायुतीमधील जागा वाटपासंदर्भात अंतिम निर्णय अद्याप झालेला नाही. अमित शाह यांच्यासोबत आज झालेल्या बैठकीनंतर महायुतीच्या नेत्यांची पुढील बैठक दिल्लीत पार पडणार आहे. महायुतीच्या जागाटपाबाबत अंतिम चर्चा दिल्लीत होऊ शकते. महायुतीच्या नेत्यांची मुंबई येथील बैठक जवळपास ४५ मिनिटं सुरु होती, अशी माहिती सूत्रांनी दिली आहे.

महायुतीला लोकसभा निवडणुकीत महाराष्ट्रात अपयश मिळालं होतं. लोकसभा निवडणुकीत झालेल्या चुका विधानसभा निवडणुकीत महायुतीच्या नेत्यांनी करु नयेत अशा सूचना देखील अमित शाह यांनी दिल्याची सूत्रांची माहिती आहे.

महायुतीतील धुसफूस चव्हाट्यावर येऊ नये, जाहीर वाद टाळावेत, अशा सूचना अमित शाह यांनी दिल्या आहेत. महायुतीच्या नेत्यांनी संयम ठेवावा आणि एकजूट असल्याचे चित्र जनतेसमोर जाईल, याची काळजी घ्यावी असं देखील ते म्हणाले. जिंकून येण्याची क्षमता असलेले योग्य उमेदवार निश्र्चित करावेत आणि विरोधकांच्या फेक नरेटिव्हला उत्तर द्या, अशा सूचना देखील अमित शाह यांनी दिल्या. भाजप नेत्यांसोबत झालेल्या बैठकीत भाजपच्या अंतर्गत सर्व्हेवर अमित शाह यांनी लक्ष वेधले असल्याची माहिती आहे. शाह यांनी राज्य सरकारने घेतलेले निर्णय जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहोचवण्याचे भाजप नेत्यांना आदेश दिले आहेत. भाजपच्या काही आमदारांची कामगिरी समाधानकारक नाही जागा बाबत योग्य निर्णय घ्या, अशा सूचना देखील अमित शाह यांनी दिल्याची माहिती सूत्रांनी दिल्या आहेत.

# पिंपरी चिंचवडमध्ये सिमेंटच्या गट्टूने ठेचून एकाची हत्या

**पिंपरी- चिंचवड/प्रतिनिधी** : पिंपरी चिंचवडमध्ये ऐन गणेशोत्सवात एकाची हत्या झाल्याचं उघडकीस आलंय. काळेवाडीतील फुटपाथवर दगडाने ठेचून हत्या केली आहे. ही हत्या पूर्ववैम नस्यातून घडल्याचा पोलिसांचा प्राथमिक अंदाज आहे मृतदेहाच्या शेजारी रक्ताने मखलेला सिमेंटचा गट्टू सापडल्याने दगडाने ठेचून हत्या करण्यात आल्याचा अंदाज आहे. या प्रकरणी वाकड पोलिस तपास करत आहेत.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, काळेवााडील फुटपाथवर दोन बेंचच्यामध्ये हा मृतदेह सोमवारी सकाळी आढळलाय. मृतदेहाच्या शेजारीच रक्ताने मखलेला सिमेंटचा गठ्ठू असल्यानं ही हत्याचं असेल असा पोलिसांचा अंदज आहे. पोलिसांनी त्याच दिशेने तपास सुरु केला आहे. मध्यरात्री तीनच्या नंतर ही घटना घडल्याचा वाकड पोलिसांचा अंदाज आहे. अद्याप मृतदेहाची ओळख पटलेली नाही, ती ओळख पटली की हत्या करणारा कोण हे उघड होणार आहे. वाकड पोलीस त्याच दिशेने सध्या तपास करतायेत.

पोलिसांनी पुण्यातील एन्जॉय ग्रुपच्या मुस्क्या आवळल्या आहेत. एन्जॉय ग्रुपकडून ७ पिस्तुलांसह १३ काडतुसे जप्त करण्यात आले आहे. शुभम जगतापसह सात जणांना लोणीकंद पोलिसांनी हिसका दिला आहे.

CMYK

# अटल भूजल योजना राज्यातील सर्व जिल्ह्यात राबविण्यासाठी केंद्राकडे पाठपुरावा करणार - पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री गुलाबराव पाटील

## भूजल समृद्ध ग्राम स्पर्धा सन २०२२-२३ चा पारितोषिक वितरण समारंभ संपन्न

दैनिक आपला विदर्भ

**नाशिक/प्रतिनिधी** : अटल भूजल योजना सध्या राज्यातील १३ जिल्ह्यांतील ११०० गावांमध्ये राबविण्यात येत आहे. या योजनेच्या अंमलबजावणीमध्ये महाराष्ट्र देशात पहिल्या क्रमांकावर आहे. येत्या काळात ही योजना राज्यातील सर्व जिल्ह्यात राबविली जावी, यासाठी केंद्र शासनाकडे पाठपुरावा करणार असल्याची ग्वाही राज्याचे पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री गुलाबराव पाटील यांनी आज येथे दिली.

पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाच्या भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, पुणे यांच्या वतीने नाशिकरोडच्या मित्रा संस्थेत भूजल समृद्ध ग्राम स्पर्धा सन २०२२-२३ चा पारितोषिक वितरण समारंभ आयोजित करण्यात आला होता. त्यावेळी पाणीपुरवठा मंत्री श्री. पाटील बोलत होते. याप्रसंगी सार्वजनिक बांधकाम मंत्री (सार्वजनिक उपक्रम) तथा जिल्ह्याचे पालकमंत्री दादाजी भुसे, खासदार भास्करराव भगरे, पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाचे प्रधान सचिव डॉ. संजय खंदारे, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेच्या आयुक्त श्रीमती पवनीत कौर, अतिरिक्त संचालक डॉ. विजय पाखमोडे आदी उपस्थित होते.

पाणीपुरवठा मंत्री श्री. पाटील म्हणाले की, ठिबक






सिंचनामुळे पाण्याची ५० टक्के बचत होते. त्यामुळे ठिबक सिंचनाचा वापर वाढला पाहिजे. गावकऱ्यांना पाण्याचे महत्त्व पटल्यास निश्चितच गावांच्या भूजल संपत्तीत वाढ होणार आहे. या योजनेसाठी गावांमध्ये लोकसहभाग वाढला पाहिजे, अशी अपेक्षा त्यांनी यावेळी व्यक्त केली.

श्री. पाटील म्हणाले की, गावा-गावांमध्ये पाणी अडविणे ही काळाची गरज असून यातूनच शाश्वत पाण्याचे स्त्रोत निर्माण होणार आहेत. विहिरींचे पुनर्भरण करणे गरजेचे आहे. पाणी बचतीबाबत जागृती होणे आवश्यक आहे. राळेगणसिद्धी, हिवरेबाजार या गावांच्या 'पाणीदार पॅटर्न'चा अभ्यास राज्यातील गावांनी केला पाहिजे. पुढील काळात शेती हीच नोकरी समजून, तिला व्यावसायिकतेची जोड देण्यासाठी पाणी अडविणे आणि त्यानंतर काटकसरीने वापर करणे हाच सर्वोत्तम उपाय आहे, असे त्यांनी सांगितले.

पालकमंत्री दादाजी भुसे म्हणाले की, भूजलाची पाणी पातळी वाढविण्यासाठी जास्तीत जास्त ग्रामपंचायतींनी अटल भूजल योजनेसारख्या योजनांमध्ये सहभाग घेऊन पाणी पातळी वाढवावी. शासनाने नार-पार प्रकल्पास मंजुरी दिली आहे. यातून दुष्काळी भागात जलसमृद्धी होणार आहे. शासन ठिबक सिंचनासाठी अनुदान देत असते. यासाठी प्रलंबित असलेले अनुदान लवकरात लवकर शेतकऱ्यांना देण्यात येईल, अशी ग्वाही त्यांनी यावेळी दिली. पाण्याची पातळी कमी झालेल्या गावांना पाणी योजनांची प्राधान्याने अंमलबजावणी करण्याची गरज आहे. विकासकामांसाठी गावांनी राजकीय स्पर्धा बाजूला ठेवून काम करावे, अशी अपेक्षाही त्यांनी यावेळी व्यक्त केली.

डॉ. खंदारे म्हणाले, राज्यातील शेती तसेच पिण्याच्या पाण्याच्या योजना भूजलावर अवलंबून आहेत. त्यामुळे गावा-गावांमध्ये अटल भूजल योजनेसारख्या योजना राबविणे आवश्यक आहे. या योजनेच्या यशस्वितेसाठी लोकसहभागही महत्त्वाचा आहे. प्रास्ताविकात आयुक्त पवनीत कौर यांनी अटल भूजल योजनेची अंमलबजावणी व उपयुक्तता याबद्दल माहिती दिली.

यावेळी पुरस्कारार्थींच्या वतीने कऱ्हाटी ग्रामपंचायतीच्या सरपंच दीपाली लोणकर, जरूड ग्रामपंचायतीचे सरपंच सुधाकर मानकर, किरकसाल गावाचे माजी सरपंच अमोल काटकर यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते अटल भूजल योजनेच्या मार्गदर्शक पुस्तिकेचे प्रकाशन करण्यात आले. पुरस्कार प्राप्त ग्रामपंचायतींच्या यशकथा सांगणाऱ्या दृश्यश्राव्य चित्रफितीही याप्रसंगी दाखविण्यात आल्या.

अशा आहेत पुरस्कार प्राप्त ग्रामपंचायती:

'लोकसहभागातून भूजल व्यवस्थापन' साध्य होण्यासाठी अटल भूजल योजनेंतर्गत भूजल समृद्ध ग्राम स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत जळगाव, पुणे, सातारा, सांगली, सोलापूर, नाशिक, जालना, लातूर, धाराशीव, अमरावती, बुलढाणा व नागपूर या जिल्ह्यांतील ग्रामपंचायतींनी सहभाग घेतला होता. राज्यस्तरीय प्रथम पुरस्कार कऱ्हाटी (जि. पुणे, ता. बारामती), द्वितीय पुरस्कार जरूड (जि. अमरावती, ता. वरूड)

व तृतीय पुरस्कार किरकसाल (जि. सातारा, ता. माण) या ग्रामपंचायतींना देण्यात आला. यात अनुक्रमे १ कोटी, ५० लाख व ३० लाख अशा राज्यस्तरीय पुरस्काराच्या रकमेचा समावेश होता. जिल्हास्तरीय पुरस्कारात प्रथम पुरस्कार - ५० लाख, द्वितीय - ३० लाख व तृतीय क्रमांकाचा पुरस्कार - २० लाख अशी बक्षिसांची रक्कम होती. जळगाव जिल्ह्यातील प्रथम पुरस्कार सावखेडे (ता. रावेर), द्वितीय पुरस्कार उंदिरखेडे (ता. पारोळा) व तृतीय पुरस्कार खिरोदा (ता. रावेर), पुणे जिल्ह्यातील प्रथम पुरस्कार कऱ्हाटी (ता. बारामती), द्वितीय सोनोरी व तृतीय चांबळी (रावेर), सातारा जिल्ह्यात प्रथम पुरस्कार किरकसाल (माण), द्वितीय निढळ व तृतीय मांडवे (खटाव), सांगली जिल्ह्यात प्रथम पुरस्कार नांगोळे, द्वितीय बोरगाव (कवठेमहांकाळ) व तृतीय वडगाव (तासगाव), सोलापूर जिल्ह्यात प्रथम पुरस्कार भेंड, द्वितीय लोढेवाडी व तृतीय सोलंकरवाडी (माढा), नाशिक जिल्ह्यात प्रथम पुरस्कार वडगावपिंगळा, द्वितीय दातली (सिन्नर) व तृतीय कनकापूर (देवळा), जालना जिल्ह्यात प्रथम पुरस्कार आंबा (परतूर), द्वितीय बोररांजणी व तृतीय हातडी (घनसावंगी), लातूर जिल्ह्यात प्रथम पुरस्कार हरगुळ (लातूर), द्वितीय जाजनूर (निलंगा) व तृतीय वडवळ (चाकूर), धाराशीव जिल्ह्यात प्रथम पुरस्कार खेड (धाराशीव), द्वितीय खामसवाडी (धाराशीव) व तृतीय भगतवाडी (उमरगा), अमरावती जिल्ह्यात प्रथम पुरस्कार जरूड, द्वितीय झटामझरी (वरूड) व तृतीय अंबाडा (मोर्शी), बुलढाणा जिल्ह्यात प्रथम निपाणा, द्वितीय शेलगाव बाजार, तृतीय वरूड (मोताळा) व नागपूर जिल्ह्यात प्रथम खेडी गेवारगोंदी (नरखेडी), द्वितीय खुर्सापार (कटोल) व तृतीय डोर्ली भांडवलकर (कटोल) या गावांचा पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला. या पुरस्कारांच्या माध्यमातून राज्यातील ३६ ग्रामपंचायतींना १३ कोटी ८० लाखांच्या पुरस्काराच्या रकमेचे वाटप करण्यात आले.

## पॅरालिंपीकमध्ये भारताची विक्रमी कामगिरी

पॅरिस येथे झालेल्या पॅरालिंपीकची नुकतीच सांगता झाली. भारतासाठी ही स्पर्धा संस्मरणीय ठरली. भारताने या स्पर्धेत ७ सुवर्ण, ९ रौप्य व १३ कांस्य अशी एकूण २९ पदके जिंकत पदक तालिकेत १८ वे स्थान मिळवले. यापूर्वी कोणत्याही स्पर्धेत भारताने इतकी पदके मिळवली नव्हती म्हणूनच ही स्पर्धा भातासाठी ऐतिहासिक ठरली. मागील २०२१ च्या टोकियो पॅरालिंपिकमध्ये भारताने १९ पदके मिळवली होती. त्याआधीच्या रियो पॅरालिंपिकमध्ये भारताने फक्त चार पदके मिळवली होती. याचाच अर्थ केवळ आठ वर्षात भारताने ४ वरून २९ वर उडी मारली आहे. भारताची ही कामगिरी जितकी आश्र्चर्यकारक आहे तितकीच ती अभिमानास्पद आहे. आजवर भारताने सर्व पॅरालिंपिक मध्ये मिळून ३१ पदके मिळवली होती त्यात आता २९ पदकांची भर पडली आहे. भारताच्या दिव्यांग खेळाडूंनी घेतलेल्या अपार मेहनतीचे फळ त्यांना या पॅरालिंपिक मध्ये मिळाले असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. अर्थात यावेळी भारतीय खेळाडू चमकदार कामगिरी करतील अशी अपेक्षा होतीच पण त्यांनी अपेक्षेपेक्षाही चांगली कामगिरी करून देश वासियांना आश्र्चर्याचा धक्का दिला. भारताला यावेळी सहा सुवर्णपदके मिळाली ही खूप मोठी कामगिरी आहे. नेमबाजी, बॅडमिंटन, गोळा फेक, थाळी फेक, तिरंदाजी, लांब उडी, उंच उडी, धावणे, ज्युडो अशा सर्वच क्रीडा प्रकारात भारताला पदके मिळाली. भारताच्या पदकांची संख्या आणखी वाढू शकली असती मात्र काही खेळाडूंची पदके अगदी थोडक्यात हुकली. यावेळेस भारताचे ८४ खेळाडू या स्पर्धेत सहभागी झाले होते त्यातील २९ खेळाडूंनी पदक मिळवले. भारतीय खेळाडूंची ही कामगिरी वाखाणण्याजोगी आहे. त्यांनी केलेल्या या विक्रमी कामगिरीचा देशातील १४० कोटी जनतेला अभिमान आहे. पॅरालिंपीक ही दिव्यांग खेळाडूंची ऑलिंपिक स्पर्धा असते. मुख्य ऑलिंपिक स्पर्धा संपल्यावर तिचे आयोजन केले जाते. मुख्य ऑलिंपिक प्रमाणेच पॅरालिंपीक स्पर्धेला पण प्रतिसाद मिळाला पाहिजे. खेळाडूंचे कौतुक झाले पाहिजे पण दुर्दैवाने तसे होताना दिसत नाही मुख्य ऑलिंपिक स्पर्धेत भारताने केवळ सहा पदके मिळवली. त्यावेळी भारतीयांना आनंदाचे भरते आले. मुख्य ऑलिंपिकमध्ये भारताने एकही सुवर्णपदक मिळवले नाही केवळ रौप्य आणि कांस्यपदकावर भारताला समाधान मानावे लागले. तरीही देशात दिवाळी सजारी झाली. प्रिंट, इलेक्ट्रॉनिक आणि सोशल मीडियावर पदक विजेत्या खेळाडूंच्या अभिनंदांची स्पर्धाच लागली पण पॅरालिंपक मध्ये विक्रमी कामगिरी करून देशाचे नाव उज्वल करणाऱ्या दिव्यांग खेळाडूंच्या पदरी मात्र निराशाच आली. या खेळाडूंचे म्हणावे तसे कौतुक झाले नाही. नीरज चोप्रा, मनू भाकर, स्वप्नील कुसाळे ही नावे १४० कोटी लोकांना माहीत आहे मात्र पॅरालिंपिक मध्ये सुवर्णपदक जिंकणाऱ्या एकाही खेळाडूचे नाव देशातील एकाही नागरिकाला माहीत नाही याला काय म्हणावे ? प्रसार माध्यमांनी देखील पॅरालिंपिकला म्हणावे तेवढे कव्हरेज दिले नाही. भारतीय क्रिकेट संघाची जर झिम्बाब्वे किंवा बांगलादेश सोबत मालिका असेल तर त्या मालिकेलाही प्रसार माध्यमे खूप मोठे कव्हरेज देतात पण पॅरालिंपिक सारख्या १८० हून अधिक देशांचा सहभाग असलेल्या जागतिक दर्जाच्या स्पर्धेकडे प्रसार माध्यमे दुर्लक्ष करतात कदाचित ही दिव्यांग खेळाडूंची स्पर्धा असल्याने प्रसार माध्यमांनी त्याकडे दुर्लक्ष केले असेल. पॅरालिंपक मध्ये विक्रमी कामगिरी करूनही या दिव्यांग खेळाडूंना त्याचे श्रेय मिळाले नाही. दिव्यांगाकडे पाहण्याचा समाजाचा दृष्टिकोन समाधानकारक नाही हेच यातून स्पष्ट होते. आजही दिव्यांगांकडे सहानुभूतीनेच पाहिले जाते वास्तविक या पदक विजेत्या दिव्यांग खेळाडूंना सहानुभूतीची नाही तर कौतुकाची, प्रोत्साहानाची गरज आहे. दिव्यांग खेळाडूंकडे पाहण्याचा समाजाचा दृष्टिकोन बदलला तर ते देशासाठी आणखी चांगली कामगिरी करून देशाचे नाव उज्वल करतील यात शंका नाही. पॅरालिंपिक मध्ये विक्रमी कामगिरी करणाऱ्या भारतीय खेळाडूंचे मनापासून अभिनंदन!

## रिसोड आगार चे व्यवस्थापक दादाराव दराडे यांची विभागीय वाहतूक अधिकारी यवतमाळ म्हणून पदोन्नती



दैनिक आपला विदर्भ

**रिसोड/प्रतिनिधी** : येथील आगार व्यवस्थापक दा. का. दराडे यांची राप रिसोड आ व्यवस्थापक म्हणून दीड वर्ष चांगल्या प्रकारे सांभाळल्या मुळे तशेच अकोला विभागामध्ये उत्पन्नामध्ये भरघोस उत्पन्न देऊन नंबर एक वर वारंवार आल्यामुळे आगार व्यवस्थापक यांचे कामगिरी उत्कृष्ट असल्याने महामंडळाने दादाराव कारभारी दराडे यांना पदोन्नती देऊन यवतमाळ विभाग या ठिकाणी विभागीय वाहतूक अधिकारी या पदावर नेमणूक देण्यात आली आगार व्यवस्थापक दराडे यांच्या काळामध्ये सर्व गाड्या स्वच्छ दोष विरहित असल्याने प्रवासी वर्गामध्ये आनंदाचं वातावरण होते रिसोड आगाराच्या सर्व फेऱ्या तसेच विद्यार्थी फेऱ्या वेळेवर रिसोड आगार व्यवस्थापक दराडे यांच्या प्रयत्नामुळे सुटत होत्या रिसोड आगाराला उत्कृष्ट अधिकारी मिळाल्यामुळे सर्व जनतेमध्ये व प्रवाशांमध्ये आनंदाचं वातावरण निर्माण झाले होते त्यांची पदोन्नती झाल्यामुळे यवतमाळ विभागामध्ये विभागीय वाहतूक अधिकारी या पदावर रुजू होऊन प्रवाशांची आणि जनतेची सेवा करणार असल्याची त्यांनी सांगितले दराडे यांना तहसीलदार दंडाधिकारी व नायब तहसीलदार दंडाधिकारी रिसोड तालुका तसेच जलसंपदा विभागातील अधिकारी व पोलीस प्रशासन अधिकारी जय लखमा डीएमएलटी अँड पॅरामेडिकल कॉलेज रिसोड चे संचालक सचिन गांजरे व पत्रकार बांधव यांनी सत्कार करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## खेतवाडी १३ व्या गल्लीत साकारले इस्कॉन टेम्पल श्री कृष्ण भगवान झोपाळ्यावर आसन असलेले गणेशाचे रूप

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी** : गेल्यावर्षी राम मंदिराचा मुद्दा खूप गाजत होता त्यामुळे राम मंदिराचे रूप खेतवाडी १३व्या गल्लीत गणेशत्सोवात साकारण्यात आले होते. यावर्षी आता इस्कॉन टेम्पल श्री कृष्ण भगवान झोपाळ्यावर आसन झालेले रूप साकारले आहे. या मंडळाच्या सर्व गणेश भक्तांच्या मनात अनेक वर्षापासून श्री कृष्ण भगवांच्या रूपातील बाप्पाची मूर्ती विराजमान करायचे होते. यंदा मंडळाने श्री कृष्ण भगवा यांच्या रूपातील बाप्पाची आणून आकर्षक देखावा साकारला आहे. लहान मुलांना



राम ,कृष्ण यांच्या बद्दल माहित व्हावं आपली संस्कृती कळावी यासाठी अशा प्रकारे गणेश मुर्ती आणि देखावे सादर करुन संस्कृती जपण्याचा प्रयत्न केला जात असल्याचे खेतवाडी गल्ली नंबर १३ चे अध्यक्ष गाजारम पाटील यांनी सांगितले.

पान १ वरून...

### फडणवीसांनी मराठ्यांना

तुम्ही ज्या पक्षात काम करत आहे त्या पक्षाचे नेते आम्हाला का आरक्षण देत नाहीत? असा सवाल आता भाजपमधल्या पुढाऱ्यांना त्यांची लेकरे विचारतील असे जरांगे म्हणाले. ते म्हणाले की, तुमच्या लेकरांवरील अन्याय कायम डोळ्यासमोर ठेवा. माझ्या विरोधामध्ये भरपूरजण उभे केले आहेत. आठवड्यालाच आमदार बदलतात. बैल बदलले जात आहेत. गावागावात घोंगडी बैठकीचे नियोजन करा असं सांगत मनोज जरांगे म्हणाले

### शरद पवार धनगर समाजाचे

आहे म्हणता तर जा त्या मुख्यमंत्री शिंदे यांना घेऊन या, तुमचा विषय तर लांबचा आहे. आमचा विषय शेकडो वर्षांपासून असून आम्ही आदिवासी आहोत, असे मिरगळ यांनी सांगितले. जरांगे यांनी पहिल्यांदा मराठा समाजाला ओबीसीमधून आरक्षण देण्याची मागणी केली. तुम्ही आधी मराठा समाजाचा ओबीसीमध्ये शिरकाव सुरु केला आहे ती मागणी सोडून द्यावी मग आम्ही तुमचे स्वागत करू, अशा शब्दात मनोज जरांगे यांना पांडुरंग मिरगळ धनगर विषयात न बोलण्याची समज दिली. राज्यातील सर्वच सत्ताधाऱ्यांनी आणि विरोधकांनी गेली ७८ वर्षे धनगर समाजाचा केवळ वापर करून घेत फसवणूक केली आहे. आता मात्र आर या पारची लढाई आचारसंहितेपूर्वी सुरु केली असून राज्य सरकारने तातडीने एक दिवसाचे अधिवेशन बोलावून धनगर समाजाला अनुसूचित जमातींमधून आरक्षण देण्याच्या अंमलबजावणीला सुरुवात करावी. अन्यथा सर्वच पक्षांना धनगर समाज आपला धनगरी इंगा दाखवेल, असा इशारा त्यांनी यावेळी दिला. आता अनुसूचित जमातीत समावेश झाल्याशिवाय आमरण उपोषण थांबणार नसून तशी वेळ आली तर आम्ही चंद्रभागेत समर्पण करू, असा इशाराही सत्ताधारी व विरोधकांना दिला आहे. दरम्यान, आज या आमरण उपोषणाला सुरुवात करण्यापूर्वीच उपोषणाला बसण्यावरून पांडुरंग मिरगळ व माऊली हळणवर या दोन नेत्यात जोरदार बाचाबाची झाल्याने मिरगळ हे आंदोलनस्थळी सोडून निघून चालले होते. मात्र, इतर समाजातील नेत्यांनी मध्यस्थी करीत हा वाद मिटविला. यानंतर विठ्ठल मंदिराला प्रदक्षिणा घालून टिळक स्मारक येथे आमरण उपोषणाला सुरुवात झाली.

## नुकसान भरपाईच्या मागणीसाठी जालना शहरात फळबागायतदार शेतकऱ्यांनी काढली भव्य रॅली

**जालना/प्रतिनिधी** : वातावरण बदलामुळे मोसंबीची फळ गळती होऊन प्रचंड नुकसान झाले आहे. त्यामुळे शासनाने शेतकऱ्यांना मदत करावी, या मागणीसाठी जालन्यात आज फळबागायतदार शेतकऱ्यांनी महारॅली काढली. जालना शहरातील छत्रपती संभाजी महाराज पुतळा येथून या रॅलीला सुरुवात झाली आणि शनी मंदिर, गांधी चमन, मस्तगड, पाणीवेस मार्गे छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्यापर्यंत ही रॅली काढण्यात आली. वर्ष २०१८ व २०२२ मध्ये मंजूर झालेला फळ पीक विमा वाटप करावा, वर्ष २०१८ ते २०२३ पर्यंतच्या फळ पीक विम्याचे सरकारी देयक शेतकऱ्यांना द्यावे यासह फळगळ नुकसान भरपाई प्रतिझाड एक हजार रुपये याप्रमाणे द्यावी याचबरोबर मोसंबी व द्राक्ष प्रक्रिया उद्योग घनसावंगी व जालना तालुक्यात सुरू करावा, वर्ष २०२४ चा फळ पीक विमा मंजूर करावा यासह विविध मागण्यांसाठी जालन्यात आज फळ बागायतदार शेतकऱ्यांनी महारॅली काढण्यात आली. शासनाने आमच्या मागण्यांची दखल घेऊन मागण्या तातडीने मान्य कराव्यात अशी मागणी शेतकऱ्यांनी केली आहे. या महारॅलीमध्ये फळ बागायतदार शेतकरी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

## महाहाविकास आघाडी संभाजी ब्रिगेड व इतर सामाजिक संघटनेच्यावतीने महापालिकेसमोर भिक मागो आंदोलन




दैनिक आपला विदर्भ

**पिंपरी चिंचवड /प्रतिनिधी** : पिंपरी चिंचवड शहरातील मोशी येथील आंतरराष्ट्रीय कृषी प्रदर्शन भरत असलेल्या जागेतील काही एकर जागा छत्रपती संभाजी महाराजांच्या स्मारकासाठी महानगरपालिकेने विकत घेतली.या ठिकाणी छ.संभाजी महाराजांचा शंभर फुटी भव्य दिव्य पुतळा व आंतरराष्ट्रीय दर्जाचे स्मारक होत आहे. ही शहराच्या तसेच शिवशंभू प्रेमी जनतेसाठी अभिमानास्पद बाब आहे.छ. संभाजी महाराज पुतळ्याचे काही भाग शिल्पकाराने महानगरपालिकेकडे पाठवले आहेत.पायातील मोजडी सह काही भागास तडे गेल्याचे नुकतेच उघडकीस आले.यामुळे सदर कामाचा दर्जा निकृष्ट असून यात प्रचंड भ्रष्टाचार झाल्याचा संशय शहरातील नागरीक व्यक्त करत आहेत.सदर स्मारकाचे काम दुसर्या ठिकाणी महानगरपालिकेने सुरू केले होते. सदर जागेत तब्बल साडे पाच कोटी रूपये खर्च केल्या नंतर महानगरपालिकेने हे काम थांबवले व नविन जागेत सुरू केले.यामुळे महानगरपालिकेचे कोट्यावधी रूपयांचे नुकसान झाले.या सर्व बाबींची मुख्यमंत्र्यांनी चौकशी करावी.यामधे दोषी असलेले महानगरपालिका आयुक्तांसह सर्व दोषींकडून झालेले नुकसान भरपाई वसूल करावे. स्मारकाचे काम दर्जेदार व्हावे यासाठी तज्ञांची समिती स्थापन करावी अशी मागणी केली आहे.यावर तात्काळ कारवाई न केल्यास तीव्र आंदोलन करण्यात येईल असा इशाराच देण्यात आला

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

# विमुक्त जातीतील बोगस राजपूत भामटा यांची अवैध घुसखोरी थांबवा

## अन्यथा तुमचा सुपडासाफ करु- गोरसेनेचे शासनाला इशारा

दैनिक आपला विदर्भ

■ देवानंद सानप



**बुलडाणा :** नुकत्याच एमबीबीएस प्रवेशप्रक्रीयेला सुरुवात झाली असून महाराष्ट्रातील विमुक्त जाती अ प्रवर्गात बोगस राजपूत भामटा ने प्रचंड घुसखोरी केली असून विमुक्त जाती प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांच्या तब्बल तिनशे पेक्षा अधिक जागा बोगस राजपूत भामटानी हडप केल्या आहेत यासाठी गोरबंजारा समाजातील अग्रेसर असलेल्या गोरसेना या सामाजिक संघटनेच्या वतीने आज संपूर्ण महाराष्ट्रात जिल्हाधिकारी, तहसीलदार, उपविभागीय अधिकारी यांच्या मार्फत शासनाला निवेदन देऊन ही घुसखोरी थांबविण्याची विनंती केली आहे अन्यथा येणार्या निवडणूकीत विद्यमान सरकारचा सुपडासाफ करण्याचा गर्भीत इशारा गोरसेनेने दिला आहे.

विमुक्त जाती अ मध्ये राजपूत भामटा या अत्यल्प लोकसंख्या असलेल्या जातीचा सामावेश असून नाम साधर्म्याचा फायदा घेत सवर्ण राजपूत, मिना,छप्परबंद या खुल्या प्रवर्गातील जनसमुदाय यांनी खुलेआम घुसखोरी करीत अभियांत्रिकी, वैद्यकीय, सह शासकीय नोकरभरतीत लाभ घेत आहे.राजपूत जातीतील लोक भामटा शब्द लावून भामटेगिरी करत असल्याने मुळ विमुक्त जाती अ प्रवर्गातील १४ तत्सम जाती आरक्षणाचे अतोनात नुकसान होत आहे म्हणून गोरसेना या संघटनेतर्फे संपूर्ण महाराष्ट्रात २०१९ पासून ठिकठिकाणी आंदोलने होत आहे. यासंदर्भात न्याय हक्क व अधिकारांसाठी गोरसेनेने राष्ट्रीय अध्यक्ष प्रा संदेश चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली संपूर्ण राज्यात निवेदने दिलीत,नंतर जिल्हा स्तरावर रास्ता रोको करण्यात आले होते. मोर्चा आंदोलने गोरसेनेनी केले.तेव्हा विधीमंडळात विशेष तपासणी आयोग एस.आय.टी. नेमण्याची घोषणा दलीत बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे यांनी केली.मात्र राजकीय दबावाखाली येत त्यांनी दुसर्याच दिवशी माझ्या कडून चुकीची घोषणा झाल्याचे सांगत एस.आय.टी. लागू करणार नसल्याचे सांगितले. तेव्हा गोरसेनेच्या वतीने नागपूर हिवाळी अधिवेशनावर नागपुरात ०८ डिसेंबर रोजी २५ -३० हजार लोकांच्या जनसमुदायाला घेऊन जन आक्रोश महामोर्चा काढण्यात आले मात्र या मोर्चाचे साधे निवेदन घेण्यासाठी सुद्धा राज्य सरकारच्या एकही मंत्र्याने औचित्य दाखविले नाही. मंत्री अतुल सावे विधीमंडळातून पळ काढला अन् मोर्चेकरीच्या नेतृत्वाला सामोरे गेले नाही. साधे निवेदन न घेतल्याने समस्त गोरबंजारा समाजाचा जाणिवपूर्वक अपमान राज्यसरकारने केलेला आहे. कालपरवा दिनकर राठोड या गोरबंजारा युवकांने पुसद येथे १४ दिवस आमरण उपोषण केले मात्र त्यांची राज्यसरकारने किंचितही दखल घेतली नाही की विधानसभेच्या पावसाळी अधिवेशनात साधी चर्चा सुद्धा केली नाही त्यामुळे गोरबंजारा समाज प्रचंड संतापलेला असून यावेळी बंजारा समाजाच्या मतावर निवडून गेलेल्या आमदारांनी समाजाचा हा जिवंत प्रश्नाकडे जाणिवपूर्वक कानाडोळा केला. बोगस राजपूत भामटा घुसखोरीच्या प्रश्नाबाबत साधे निवेदन न केलेल्या राज्यसरकारला धडा शिकवण्यासाठी गोरसेनेचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रा संदेश चव्हाण यांनी कंबर कसली असून या वेळी ६२ विधानसभा आमदारांना घरचा रस्ता दाखवण्याचा गर्भित इशारा गोरसेनेने दिले आहे. या अगोदर संपूर्ण राज्यात १८जिल्हायात जोडे मारो आंदोलन केले होते . त्यानंतर संपूर्ण महाराष्ट्रात गोरसेनेने विविध ठिकाणी रास्ता रोको आंदोलन केले होते त्यामध्ये तुळजापूर,जालना, मंठा,पुसद,दिग्रस, दारव्हा, अकोला,वाशीम, हिंगोली,नांदेड,बीड,बुलढाणा आदी ठिकाणचा सामावेश होता . बोगस राजपूत भामटा यांच्या घुसखोरीविरोधात गोरसेनेने रणसिंग फुंकलेले असून गोरसेनेचे आंदोलन हे जन आंदोलन होत आहे.तांडा,वाड्यावरुन या आंदोलनाला जनतेचे मोठे पाठबळ लाभत आहे. विमुक्त जाति (अ) प्रवर्गात अवैध मार्गाने खोटे जात वैधता प्रमाणपत्र घेणाऱ्या लाभार्थ्यासह खोटे प्रमाणपत्र वितरित करणाऱ्या अधिकाऱ्यावर कार्यवाही करण्यासाठी विशेष तपासणी पथक ( ङखढ) लागू करण्यात यावी . (२) संपूर्ण महाराष्ट्रात जिल्हा ठिकाणी जिल्हा जात वैधता पडताळणी समितीमध्ये वि . जा . (अ) प्रर्वगातील एका तज्ञ व्यक्तीस शासकिय प्रतिनीधी महन्नुण नेमणुक देण्यात यावी . (३) २४ नोव्हेंबर २०१७ च्या महाराष्ट्र शासनाकडून निर्गमित झालेला रक्त नातेसंबंधाचा निकष लावून जात वैधता प्रमाणपत्र देण्याचे शासन निर्णय (ऋ ठ) त्वरित रध्द करण्यात यावा . (४ ) संपूर्ण महाराष्ट्रात खरे राजपूत जातीचे लोक प्रत्यक्षात कुठे निवासी राहतात त्या तालुका निहाय जिल्ह्याची यादी शासनामार्फत त्वरित जाहीर करण्यात यावी . (५) राज्य मागास अहवाल क्र ४९ / २०१४ लागु करण्यात यावा . (६) महाराष्ट्र शासनाने विमुक्त भटक्या जमातींना लागू केलेली उन्नत व प्रगत गटाची अट त्वरित रद्द करण्यात यावी .

या मागण्या मान्य न झाल्यास येत्या निवडणुकीला संपूर्ण विमुक्त जाती अ प्रवर्गातील जातीचे विशेषतः बंजारा जातीमध्ये तीव्र संताप निर्माण होऊन भविष्यात राज्यसरकारला फार मोठी किमंत चुकवावी लागणार आशा प्रकारचे निवेदन लोणार तहसीलदारांना देण्यात आले, वेळी गोर सेना जिल्हा सचिव वितेश चव्हाण,तालुकाध्यक्ष भारत राठोड,तालुका सचिव पवन राठोड,राहुल जाधव, भगवान , जाधव रामदास , ज्ञानेश्र्वर , दुर्गादास चव्हाण सह शेकडो गोर सैनिक उपस्थित होते .

## संक्षिप्त...

### विघ्नहर्ता गणेश मडळाच्यावतीने रक्तदान शिबिर २२२ जणांनी केले रक्तदाण



दैनिक आपला विदर्भ

■ प्रकाश भुरे

**मालेगाव :** दरवर्षी प्रमाणे या ही वर्षी मालेगांव येथील विध्नहर्ता गणेश मंडळाच्या वतीने यंदा १८ फुट गणेशाची मुर्ती स्थापन केली व विविध उपक्रम राबविण्यात आले रक्तदान शिबिर व नेत्र तपासणी शिबिर ठेवण्यात आले या शिबिरामध्ये २२२ लोकांनी रक्तदान केले व मंडळाच्या वतीने त्या लोकांना दोन लाख रुपयाचा क्सीडंट विमा मंडळाच्या वतीने फ्री मध्ये काढण्यात आला विघ्नहर्ता गणेश मंडळ दरवर्षी सामाजीक उपर्कम राबवित असते त्यांच प्रमाणे या ही वर्षी सामाजिक उपक्रम राबीविण्यात आले यावेळी मालेगाव येथील ठाणेदार संजय चौधरी आशीष मुंदडा बिरला व विघ्नहर्ता फॉन्डेशन चे कार्यकते उपस्थित होते

### राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी पहिल्यांदाच नाशिक मधील विकास कामांचा घेतला आढावा



दैनिक आपला विदर्भ

**नाशिक/प्रतिनिधी :** राज्यपाल सी पी राधाकृष्णन हे स्वतः लोकप्रतिनिधी, शासकीय अधिकारी यांच्याकडून आढावा घेताय. राज्यपालांकडून विकासकामे, योजनांची अंमलबजावणी यांसह विविध समस्यांबाबत आढावा घेतला जातोय. गोदावरी नदी प्रदूषणासह सिंहस्थ कुंभमेळ्याच्या बाबतही आढावा राज्यपालांनी घेतलाय. राज्यात पहिल्यांदाच राज्यपालांकडून आढावा घेतला जात असल्यानं नाशिक लोकप्रतिनिधी स्वागत केलंय. खासदार भास्कर भगरे यांनी आपल्या मतदार संघातील समस्या मांडत राज्यपालांच्या या पुढाकाराचे स्वागत केले आहे. राज्यपालांचा नवा पायंडा असला तरी त्याकडे सकारात्मकतेने बघावे असं आवाहन यावेळी पालकमंत्री दादा भुसे यांनी केलंय. तर काँग्रेसचे आमदार हिरामण खोसकर यांनी आदिवासी भागातील प्रश्र्न राज्यपालांसमोर मांडलेय. विधानसभेचे उपाध्यक्ष नरहरी झिरवळ यांनी राज्यपालांचे खास स्वागत केले आहे, आदिवासींच्या बाबत खास कक्ष राजभवनात केल्यानं आभार मानलेय. राज्यपाल यांनी घेतलेला हा पुढाकार राज्यातील राजकारणात चर्चेचा विषय ठरण्याची शक्यता आहे.

### कांदिवली पूर्व समर्थनगर सोसायटीत सुमारे ३ महिन्यांपासून बिल्डरच्या हलगर्जीपणा मुळे नागरिक पाण्यापासून वंचित




दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** मुंबईत गणपती महोत्सव सुरू आहे. श्री गणेशाच्या भक्तीसाठी लोक स्वच्छता आणि पूजेत मग्न आहेत. मात्र मुंबईतील कांदिवली पूर्व समर्थनगर सोसायटीतील सुमारे ३ महिन्यांपासून शेकडो रहिवासी बाप्पाच्या सेवेसाठी पाण्याच्या प्रत्येक थेंबाची वाट पाहत आहेत. लोकांना पिण्याचे पाणी देखील मिळत नसल्याने नागरिक संकटात सापडले आहे. पावसाळा असुन देखील नागरिकांचे हाल होत आहे नागरिकांनी आज संप्तत होत आंदोलन केले पण पोलिसांनी आंदोलकांना ताब्यात घेतले.


### राजश्री उंबरे यांच्या उपोषणाच्या समर्थनार्थ जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा



**नांदेड/प्रतिनिधी :**धर्मवीर छत्रपती संभाजीराजे शोर्य प्रतिष्ठाण महिला अध्यक्षा राजश्री पाटील उंबरे यांनी छत्रपती संभाजीनगर येथे उपोषण सुरु केले आहे. मराठा समाजाला आरक्षण देण्यात यावे, महाराष्ट्रातील शेतकरी, शेतमजूर यांच्या मुलांना मोफत शिक्षण देण्यात यावे यासह विविध मागण्यांसाठी राजश्री उंबरे यांनी उपोषण सुरु केले आहे.

# नवी मुंबईतील पहिल्या सार्वजनिक शिव छाया मंडळाने साकारला शिव राज्याभिषेकाचा देखावा

दैनिक आपला विदर्भ



**नवी मुंबई/प्रतिनिधी :** नवी मुंबईतील तुर्भे मधील शिव छाया मित्र मंडळ हे नवी मुंबईतील पहिले सार्वजनिक गणेश मंडळ असून या ठिकाणी प्रत्येक वर्षी नव नवीन देखावे उभारले जातात. या वर्षी मंडळाने छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेक सोहळा देखावा साकारला आहे. नवी मुंबईसह रायगड, ठाणे,मुंबई मधून लाखो गणेश भक्त देखावा पाहण्यासाठी आणि बाप्पाचे दर्शन घेण्यासाठी याठिकाणी येत असतात. रोज हजारो गणेश भक्त या ठिकाणी दर्शनासाठी गर्दी करतात. मंडळाचे या वर्षीचे ५४ वर्ष असून, दहा फुटांच्या बाप्पाचे विलोभनीय रूप पाहण्यासाठी आणि आपल्या मोबाईल मध्ये कैद करण्यासाठी गणेश भक्त अतुर होताना दिसतात. अकरा दिवस चालणाऱ्या या उत्सवात मंडळ अनेक समाजोपयोगी उपक्रम राबवले जाता. यात रक्तदान शिबिर,आरोग्य शिबीर,ज्येष्ठ नागरिक,सफाई कामगार यांचा सत्कार तर महिला सक्षमकरणासाठी काही कार्यक्रम घेतले जातात. शिव छाया मंडळ अत्यंत जुने आणि नवी मुंबईतील पहिले सार्वजनिक मंडळ असून, मंडळ दान पेटीत आलेले पैसे कुणाला मदत तर समाजोपयोगी कार्यक्रमासाठी वापरले जातात. अकरा दिवस अनेक कार्यक्रम आणि करमणुकीचे कार्यक्रम घेतले जातात,तर बाहेर मेळा भरवला जातो. तर दर्शनासाठी आलेल्या भक्तांना काही त्रास झाल्यास प्रथमोपचार करून सोडले जाते. नवी मुंबई सह इतर ठिकाणाहून लाखो भक्त देखावा पाहण्यासाठी येतात तर बाप्पाचे दर्शन घेऊन आनंद व्यक्त करतात.

### अनुष्का शर्माच्या बहिणीच्या इंटीमेट सीनने इंटरनेवर राडा

OTT वर इंटीमेट सीन असलेल्या अनेक सीरिज आणि चित्रपट आहेत ज्यांनी सोशल मीडियावर खळबळ उडवली. अशातच आता अनुष्का शर्माच्या बहिणीच्या इंटीमेट सीनने इंटरनेवर राडा घातलाय.





राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी लालबागच्या राजाचे घेतले दर्शन

# इंदापुरात सापडले बॉम्ब, एक दोन नव्हे तर तब्बल ९ सुतळी बॉम्ब; सराईत गुन्हेगाराच्या पोलिसांनी आवळल्या मुसक्या

दैनिक आपला विदर्भ



**इंदापूर/प्रतिनिधी :** टीव्हीवर आणि चित्रपटात शोभतील असे बॉम्ब प्रत्यक्षात पुणे जिल्ह्यातल्या इंदापूर तालुक्यातील वालचंदनगर पोलिसांनी दरोडेखोराकडून ताब्यात घेतलेत त्यामुळे एकच खळबळ उडाली आहे. या प्रकरणी वालचंदनगर पोलिसांनी एकाला ताब्यात घेतलं आहे. सुयश ऊर्फ तात्या सोमनाथ घोडके,वय २३ वर्षे,राहणार कळंब तालुका इंदापुर जिल्हा पुणे असं आरोपीचं नांव आहे. याबाबत आता वालचंदनगर पोलिसात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

वालचंदनगर पोलिसांनी एक-दोन नव्हे तर तब्बल नऊ बॉम्ब तीन पिस्टन आणि तलवारी कोयते घेऊन दरोडा टाकणाऱ्या सराईत गुन्हेगाराला वेळीच सापळा रचून त्याच्या मुस्क्या आवळल्याची माहिती अप्पर पोलीस अधीक्षक गणेश बिराजदार यांनी दिली आहे.

वालचंदनगर पोलिसांनी ऐन गणपती व ईद-ए-मिलाच्या मुहूर्तावर केलेल्या या कारवाईचे सर्वत्र कौतुक केले जात आहे.


आरोपी सुयश ऊर्फ तात्या सोमनाथ घोडके रा. कळंब याचा वालचंदनगर पोलीस शोध घेत होते.तो वालचंदनगर येथील अंजली बाल मंदीर क्रमांक ०१ येथील कामगार वसाहतीच्या पोस्ट कॉलनी डी - ३ मधील खोली क्रमांक ०३ मध्ये त्याच्या मित्रांसोबत असल्याची बातमी पोलिसांना मिळाली. त्यानुसार वालचंदनगर पोलिसांच्या पाथकाने त्या ठिकाणी सापळा लावला आणि सदर आरोपीला ताब्यात घेतले.

यात पोलिसांनी त्यांच्याकडून ३ गावठी पिस्टल मॅग्झीन सहीत एक खाली मॅग्झीन,दहा जिवंत काडतुसे (राऊंड),चौदा वेगवेगळ्या कंपनीचे मोबाईल, दोन लोखंडी कटर,एक लोखंडी तलवार,दोन लोखंडी चाकु, एक मुठ नसलेले तलवारीचे पाते आणि ९ सुतळी बॉम्ब असा मुद्देमाल पोलिसांनी ताब्यात घेतला आहे.

# पुण्यात घरगुती गणपती समोर साकारलाय मनोज जरांगे पाटलांचा देखावा

दैनिक आपला विदर्भ





**पुणे/प्रतिनिधी :** पुण्यातील एका पुणेकरांने आपल्या घरातील बाप्पा समोर मराठा आरक्षणाचा देखावा तयार केला आहे. या देखाव्यात मनोज जरांगे पाटील यांनी केलेल्या आंदोलनाचा संपूर्ण प्रवास दाखवण्यात आलाय गुरुवार पेठेतील आपल्या घरी किरण चव्हाणांनी हा देखावा तयार केला आहे.

पुण्यातसह राज्यभारात सध्या गणेश उत्सवाची धामधूम पाहायला मिळतीये, पुण्यातल्या गणेशोत्सवाचे मुख्य आकर्षण असते ते गणेशोत्सवातले देखावे. पुण्यात सार्वजनिक गणेश उत्सवाबरोबर घरातले गणेशोत्सवाचे देखावे सुद्धा मोठे आकर्षक असतात, असाच एक देखावा पुण्यात सादर करण्यात आलाय.

ज्या व्यक्तीच्या आंदोलनाने महाराष्ट्राचे राजकारण समाजकारण ढवळून निघाले त्या मनोज जरांगे पाटलांचा देखावा त्याचा आंदोलनाचा सगळा प्रवास या देखाव्यातून या ठिकाणी सादर करण्यात आलाय. अगदी मनोज जरांगे जेव्हा अंतरवाली सराटी येथे उपोषणाला बसले होते ते ज्या पद्धतीने उपोषण करायचे त्यांची रचना कशी होती, हे सर्व या देखाव्यामध्ये साकारण्यात आलयं. मग त्यामध्ये अंतरवाली सराटीचे ते मंडप असेल तो स्टेज असेल छत्रपती शिवाजी महाराजांची ती मूर्ती असेल ते लोकांची बसण्याची पद्धत असेल हे सगळ या देखाव्या मध्ये सादर करण्यात आलेला आहे.

त्यानंतर त्यांना मिळालेला प्रतिसाद आणि राज्यभरात होणारे मनोज जरांगेंचं जंगी स्वागत त्यांचा राज्यभर काढण्यात आलेला दौरा, त्यांचा कॉनवा जेसीपी मधून होणारे स्वागत हे देखील या देखाव्यामध्ये चव्हाण यांनी दाखवला आहे.

# शेतकरी मित्र दिलीप चौधरी व शेतकरी योद्धा बालाजी सोसे ३० सप्टेंबरला करणार आत्मदहन

दैनिक आपला विदर्भ

■ देवानंद सानप

## आता मी कुणाचाच ऐकणार नाही मदत द्या नाहीतर आत्मदान करणाराच

**सिंदखेडराजा :** ठिबक व तुषार सण २०२३-२४ मधील प्रलंबित अनुदान तात्काळ द्या तसेच पिक विमा संपूर्ण सिंदखेड राजा विधानसभा मतदारसंघातील शेतकऱ्यांना सरसकट द्या नाहीतर अन्यथा ३० तारखेला कुणाचेच काही ऐकणार नाही अशी स्पष्ट भूमिका शेतकरी मित्र दिलीप भाऊ चौधरी व शेतकरी योद्धा श्री बालाजी सोसे यांनी घेतली आहे सन २०२४ करिता शेतकऱ्यांनी ठिबक व तुषार साठी केलेल्या अर्जाची लॉटरी निवड करून व पूर्वसंमती देऊन अनुदान मिळण्यासाठी शेतकरी अर्ज ऑनलाईन करून सुद्धा तरी पण सरकारच्या हलगर्जीपणामुळे सध्या शेतकऱ्यांना ठिबक व तुषार मिळण्यास विलंब होत आहे शेतकरी मित्र दिलीप चौधरी व शेतकरी योद्धा बालाजी संतोबा सोसे व महाविकास आघाडी



तसेच तहसील कार्यालय मार्फत शासनाकडे २९/०८/२०२४ ला वरील संदर्भात आपणास निवेदन सादर करण्यात आले होते परंतु सदर निवेदनाबाबत कोणतीही कारवाई झालेली नाही त्यामुळे आज दिनांक ९/०९/२०२४ ला बैलगाडी ट्रॅक्टर मोर्चाचे नियोजन करण्यात आले आहे, ठिबक व तुषार सिंचनाची वापर करून पाणी, खत, वीज ,मजूर, बचत करून शेतमालाचे अधिक व



दर्जेदार उत्पादन यावेत म्हणून शेतकरी सूक्ष्म सिंचनाचा अवलंब करीत आहे केंद्र व राज्य सरकार द्वारे राष्ट्रीय कृषी विकास योजना प्रती थेंब अधिक पीक अंतर्गत शेतकऱ्यांनी सण २०२३-२४ या आर्थिक वर्षात कर्जाचे पैसे काढून काही शेतकऱ्यांनी स्वतः ची गुंतवणूक करून अनुदान मिळते म्हणून ठिबक व तुषार संच खरेदी केलेले आहेत परंतु शासनाने पूर्वसंमती देऊनही आजपर्यंत शेतकऱ्याला गेल्या दीड ते दोन वर्षापासून अनुदान दिले नाही, तरी या थकीत शेतकऱ्यांना अनुदान देण्यात यावे, तसेच काही शेतकऱ्यांनी सन २०२४-२५ मध्ये नवीन अर्ज केलेले आहेत या आर्थिक वर्षामध्ये ठिबक व तुषार सिंचन साठी लॉटरी होऊन निवड झालेली नाही ही योजना ठप्प आहे तरी पूर्वसंमतीची प्रतिक्रिया पूर्ण करून द्यावी जेणेकरून संच घेऊन पिकास योग्य पाणी व खत देण्यास शेतकरी यांना नियोजन करता येईल. त्याचप्रमाणे रिजेक्ट केलेल्या शेतकऱ्यांचे पिक विमा अर्ज रिऐक्टिव करावी, व रद्द केलेले पिक विमा अर्जाचा सरसकट पिक विमा शेतकऱ्यांना मिळावा. व तसेच ज्या मंडळामध्ये राज्य सरकारने शेतकऱ्यांची नुकसान भरपाईची गारपीटीची मदत दिली त्या ठिकाणी सरसकट पिक विमा देण्यात यावा ऑनलाईन असो अगर नसो कारण अर्ज ऑनलाईन करते वेळेस साईट बंद होती ऑफलाईन अर्ज घेतले नाही म्हणून अशा शेतकऱ्यांनी काय करायचे जर वरील प्रमाणे पंधरा दिवसात शेतकऱ्यांचे ठिबक /तुषारचे थकीत अनुदान व रद्द झालेले शेतकऱ्यांचे पीक विमा रक्कम मिळाली नाही तर मी शेतकरी मित्र दिलीप चौधरी, शेतकरी योद्धा श्री बालाजी सोसे दिनांक ३०/०९/२०२४ शासनाच्या विरोधात आत्मदानाचा इशारा देत आहे तरी शासनाने याची दखल घेऊन त्वरित शेतकऱ्यांची अनुदान व विम्याची रक्कम अदा करावी.

## वृत्तविशेष...

### सापांना जीवदान द्या सर्पमित्र वनिता बोराडे



दैनिक आपला विदर्भ

■ देवानंद सानप

**बिबी :** किनगाव जट्टू येथे, बाल गणेश मंडळाच्या वतीने ८ सप्टेंबरला राम मंदिरासमोरील सभागृहामध्ये जगातील पहिल्या सर्पमित्र वनिता बोराडे यांचा मार्गदर्शनाचा कार्यक्रम संपन्न झाला, यावेळी कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती म्हणून सरपंच शारदा महाजन, वनिता बोराडे, गायक डी भास्कर, अजय चौधरी हजर होते, कार्यक्रमाच्या सुरुवातीला बाल गणेश मंडळाच्या वतीने सर्पमित्रांचा सत्कार करण्यात आला. त्यानंतर गायक डी भास्कर यांनी बालकांना कविता म्हणून दाखविल्या तसेच सापाविषयी मार्गदर्शन करून माणसाच्या मनामध्ये जे गैरसमज आहेत ते दूर केले, त्यानंतर सर्पमित्र वनिता बोराडे यांनी साथ दिल्यानंतर त्याला मारण्याची जीवदान देणे आवश्यक आहे असे सांगितले, साप हा माणसाचा शत्रू नसतो शेतकऱ्याचा एक चांगल्या प्रकारचा मित्र आहे याबाबत सविस्तर समजावून सांगितले. प्रत्येक साप हा विषारी नसून साप चावल्यानंतर त्वरित सरकारी दवाखान्यात जाण्याचा सल्ला सुद्धा त्यांनी दिला, सदर कार्यक्रमाला गावकऱ्यांनी भरभरून प्रतीसाद दिला कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन विनोद सातपुते यांनी केले, कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी बाल गणेश मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी परिश्रम घेतले, या छोट्याशा बालकांनी हा आगळावेगळा कार्यक्रम आयोजित केल्यामुळे, गावकऱ्यांनी या बाल गणेश मंडळाचे कौतुक केले

## भाजपा आ. नितेश राणे यांच्या विरोधात देशद्रोहाचा गुन्हा दाखल करा; वंचितचे जिल्हाधिकारी कार्यालयात आंदोलन




दैनिक आपला विदर्भ

**धुळे/प्रतिनिधी :** भाजपा आमदार नितेश राणे यांनी मुस्लिम विरोधात आक्षेपार्ह विधान करून मुस्लिम धर्मियांविषयी द्वेषभावाना ठेवून केलेले आहे. मुस्लिमांनी मी आल्यावर आपले दरवाजे बंद करुन घ्यावेत, तसेच मुस्लिमांना घरात घुसुनच काय, तर म्हशीदित घुसुन मारु, असे विधान केल्याने वंचित बहुजन आघाडी चांगलीच आक्रमक झाली आहे.

आमदार नितेश राणे यांचा हेतु हा राज्यात हिंदू आणि मुस्लिमांच्या दंगली घडविण्याचा स्पष्ट आहे. नितेश राणे हे नियमितपणे असे मुस्लिम, दलित, आदिवासी विरोधी बेताल वक्तव्य सातत्याने करीत असतात. अशा या विधानास नितेश राणे, राज्य प्रशासन व जिल्हा प्रशासन जबाबदार आहे. त्यांच्या या अशा विधानाने राज्यामध्ये अराजकता माजुन दंगली घडू शकतात, त्या अनुषंगाने नवीन आलेल्या कायद्यानुसार त्यांच्यावर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करून त्यांना अटक करा. अशी मागणी करीत जोरदार घोषणाबाजी करीत निदर्शने करण्यात आली.

## यवतमाळ जिल्ह्यात डेंग्यूच्यो रुग्ण संख्येत वाढ



दैनिक आपला विदर्भ

**यवतमाळ/प्रतिनिधी :** यवतमाळ जिल्ह्यात डेंग्यूच्या रुग्णांच्या संख्येत वाढ होत असल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. उपचार घेण्यासाठी रुग्णांची खासगी व शासकीय रुग्णालयात गर्दी होत आहे. पावसाळ्यात डासांची मोठ्या प्रमाणात उत्पत्ती होते त्यामुळेच डेंग्यूच्या रुग्णसंख्येत वाढ झाली आहे. चिकगुनिया व डेंग्यू हे दोन्ही आजार एडीस या डासापासून होतो. या डास घरामध्येच तयार होतो आणि घरातील व्यक्तींना थोडा-थोडा चावतो त्यामुळे एकाच वेळी त्या सर्व व्यक्ती आजारी पडू शकतात. हा डास फक्त दिवसा चावतो त्यामुळे नागरिकांनी घरामध्ये असताना संपूर्ण अंग झाकले पाहिजे, घरासह परिसर स्वच्छ ठेवला पाहिजे असे आवाहन जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. प्रल्हाद चव्हाण यांनी केले आहे.

## गोंदिया शहरात गुडघे परिवाराने गणेश मूर्तीजवळ साकारली महिला अत्याचाराची थीम

दैनिक आपला विदर्भ

**गोंदिया/प्रतिनिधी :** सध्या सर्वत्र गणेश उत्सवाची धामधूम सुरू आहे. अनेक नागरिकांनी आपल्या घरी गणपती बाप्पा यांची मूर्ती विराजमान केली आहे. त्या निमित्त अनेकांनी आपल्या घरी गणपती बाप्पासाठी सुंदर असे देखावे तयार केले आहेत आणि एक सामाजिक संदेश देण्याचा प्रयत्न केला आहे. गोंदिया जिल्ह्यात देखील असाच संदेशपर देखावा साकारण्यात आला आहे. जिल्ह्यातील गुडघे



परिवाराने हा देखावा साकारला आहे. गोंदिया शहरातील प्राची प्रमोद गुडघे या महिलेने आपल्या घरी गणपती बाप्पा करिता यावर्षी महिला अत्याचारावर कडक कायदा करण्याची मागणी करणारी थीम दाखवत देखावा तयार केला आहे. या देखाव्यातून महिलांवर होणाऱ्या अत्याचारांविषयी जाब विचारण्याचा प्रयत्न करत अत्याचाऱ्यांना कडत शिक्षा व्हावी व अत्याचार होऊ नयेत यासाठी कडक कायदा करण्याची मागणी करण्यात आली आहे. विविध चित्रांच्या आधारे हा देखावा सादर करण्यात आला आहे. या माध्यमातून एक सामाजिक संदेश दिला आहे आणि सरकारने अत्याचार करणाऱ्यांना कडक शिक्षा द्यावी अशी मागणी केली आहे.

## भा.मा. कन्या शाळेत अनंत पारितोषिका अंतर्गत गुणवंत विद्यार्थिनींचा सत्कार



दैनिक आपला विदर्भ

**रिसोड/प्रतिनिधी :** भारत माध्यमिक कन्या शाळा व कनिष्ठ महाविद्यालया मध्ये दि. ५ सप्टेंबर रोजी डॉ.सर्वपल्ली राधाकृष्ण यांचा जन्मदिवस शिक्षक दिन साजरा करण्यात आला. तसेच वर्षभरामध्ये ज्या विद्यार्थिनींनी विशेष प्राविण्य प्राप्त केलेले आहे अशा गुणवंत विद्यार्थिनींचा अनंत पारितोषिकांतर्गत सत्कार करण्यात आला.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षा सौ. जयश्रीताई देशमुख, बद्रीनाथ कोकाटे गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती रिसोड, सौ.विद्याताई सारडा.नायब तहसीलदार, सौ. अमितााताई गिऱ्हे बालविकास प्रकल्प अधिकारी, प्राचार्या सौ.मंजुषा सु. देशमुख माता पालक शिक्षक संघाच्या अध्यक्ष व सचिव जेकोटिया व सोळुंके मॅडम,भारत मराठी प्राथमिक शाळेच्या मुख्याध्यापिका दुबे मॅडम, तसेच रिसोड नगर परिषदेच्या माजी अध्यक्षा प्रा.विजयमाला आसनकर व भारत माध्यमिक विद्यालय चिंचांबाभर चे मुख्याध्यापक शिंदे सर इत्यादी मान्यवरांच्या हस्ते शिक्षक दिन व सत्कार समारंभ पार पडला. प्रथमतः दरवर्षी सेवा जेष्ठतेनुसार अशा दोन आदर्श शिक्षकाचा गुणगौरव केला जातो. या वर्षातले आदर्श शिक्षक विजय हराळकर सर व आदर्श शिक्षिका सौ.स्मिता देशमुख मॅडम या शिक्षक- शिक्षिकेचा सौ. जयश्रीताई देशमुख यांच्या हस्ते शाल, श्रीफळ ,ट्रॉफी आणि बुके देऊन गौरव करण्यात आला.

प्राचार्या सौ.मंजुषा सु.देशमुख यांनी आपल्या प्रास्ताविकातून अनंत पारितोषिक व गुणगौरव सोहळ्याचा उद्देश स्पष्ट केला. शेवटी अध्यक्षीय मनोगतातून दि आर्य शिक्षण संस्थेच्या उपाध्यक्षा सौ. जयश्रीताई देशमुख यांनी परमेश्वरापेक्षाही गुरुचे स्थान आजही श्रेष्ठ कसे आहे हा संत कबीर यांचा संदर्भ देत 'गुरु गोविंद दोहो खडे...यातून गुरु आणि परमेश्वर एका ठिकाणी उभे असताना शिष्य प्रथमतः गुरूच्या चरणावर नतमस्तक होतो हा प्राचीन संदर्भ अथवा दाखला देत गुरुचे स्थान व कार्य कसे पवित्र आहे. हे गुरु विषयी आपल्या मनोगतातून विचार मांडले. तसेच विद्यार्थिनींना भावी वाटचालीसाठी अनंत शुभेच्छा देत स्वतः सक्षम बना सल्ला दिला.

सूत्रसंचालन विजय हराळकर व प्रा. दीपिका पुंड आणि किरण राजगुरू मॅडम यांनी केले तर आभार प्रा.श्याम चौमवाल यांनी मानले.

## राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांचे जळगाव विमानतळावर आगमन ; ग्रामविकास मंत्री गिरीश महाजन यांनी केले स्वागत

**जळगाव/प्रतिनिधी :** महाराष्ट्राचे राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांचे आज संध्याकाळी जळगाव विमानतळावर आगमन झाले. राज्याचे ग्रामविकास मंत्री गिरीश महाजन यांनी त्यांचे स्वागत केले. तसेच खासदार स्मिता वाघ, आमदार चिमणराव पाटील, आमदार सुरेश भोळे यांच्यासह जिल्हाधिकारी आयुष प्रसाद, जिल्हा पोलिस प्रमुख डॉ. महेश्र्वर रेड्डी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. अंकित, महानगर पालिका आयुक्त ज्ञानेश्र्वर ढेरे यांनीही स्वागत केले. विमानतळावर राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांना जिल्हा पोलिस दलाकडून मानवंदना देण्यात आली आहे.

## नागरे महाविद्यालयात विविध स्पर्धांचे आयोजन

दैनिक आपला विदर्भ

■ देवानंद सानप

**सिंदखेडराजा :** दुसरबीड स्थानिक नारायणराव नागरे महाविद्यालय मध्ये दिनांक ९ सप्टेंबर २०२४ राष्ट्रीय सेवा योजना व रेड रिबीन क्लब अंतर्गत विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले . प्राचार्य डॉ . विजय नागरे अधिसभा तथा व्यवस्थापन परिषद सदस्य संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ अमरावती तसेच प्रमुख पाहुणे म्हणून सिंदखेड राजा येथील आरोग्य केंद्राच्या कर्मचारी सौ सारिका खंडारे मॅडम एच. आय. व्ही. समुपदेशक उपस्थित होत्या. त्यांनी विद्यार्थ्यांना कार्यक्रमासाठी विविध स्पर्धेत भाग घेण्यास प्रेरित केले.

महाविद्यालयांमध्ये रांगोळी स्पर्धा, वकृत्व स्पर्धा व पोस्टर प्रेसेंटेशन स्पर्धा चे आयोजन करण्यात आले होते.

या स्पर्धेचे पर्यवेक्षक म्हणून डॉ.दीपक देशमाने डॉ. प्रा.मिलिंद गवळी प्रा. डॉ.गणेश घुगे प्रा. शेख युनूस प्रा.भगवान शिंदे प्रा. नयना गवारे प्रा. सत्यम श्रीवास्तव प्रा. महेश कायंदे यांनी विद्यार्थ्यांच्या कार्याचे परीक्षण करून त्यांचे प्रथम , द्वितीय व तृतीय क्रमांक काढले . रांगोळी स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांक कु. आश्र्विनी नागरे द्वितीय क्रमांक कु. अस्मिता मोहिते व तृतीय क्रमांक कु .भाग्यश्री जाधव यांनी पटकावला. तसेच पोस्टर प्रेसेंटेशन मध्ये प्रथम क्रमांक कु . ईश्वरी बरांडे द्वितीय क्रमांक प्रज्वल सांगळे तसेच तृतीय क्रमांक अनुराग ससाने या विद्यार्थ्यांची निवड झाली . वकृत्व स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांक कु. पायल सांगळे द्वितीय क्रमांक कु. अश्विनी नागरे व तृतीय क्रमांक ज्ञानेश्वर दौंड हे बक्षीसाचे मानकरी ठरले. त्यांना



कार्यक्रमाचे अध्यक्ष व प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते रोख रक्कम प्रमाणपत्र देण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. विजय नागरे यांनी विद्यार्थ्यांना वकृत्व स्पर्धे विषयी व रांगोळी आणि पोस्टर प्रोजेक्ट स्टेशन याविषयी माहिती देऊन विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवल्याबद्दल व बक्षीसास पात्र ठरलेल्या विद्यार्थी व विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले तसेच अतिथी म्हणून सौ सारिका खंडारे एचआयव्ही समुपदेशक या सुद्धा उपस्थित होते कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. डॉ. दीपक देशमाने यांनी केले तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. मिलिंद गवळी व आभार प्रा. शेख युनूस यांनी मानले. या कार्यक्रमासाठी श्री अनिल रणमळे श्री अनिल गायकवाड यांनी परिश्रम घेतले महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते .

## शेकडो रुग्णांचे प्राण वाचवणारा देवदूत! १५ किमीची पायपीट करत स्वखर्चाने करतोय उपचार

दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी :** बुलढाणा जिल्ह्यातील अतिदुर्गम अशा मध्यप्रदेशच्या सीमेवर असलेल्या गोमाल गावात गेल्या आठवडाभरापासून अतिसराच्या साथीने थैमान घातले आहे.

गोमाल या गावाला स्वातंत्र्यानंतरच्या काळातही रस्ता न मिळाल्याने अतिसाराने तीन रुग्णांना आपला जीव गमवावा लागला , त्यांना वेळेत उपचार न मिळाल्याने हे मृत्यू झालेत.

मात्र आठवडाभरापासून असलेल्या अतिसाराच्या साथीची साधी दखलही आरोग्य प्रशासनाने घेतली नसल्याने जळगाव जामोद येथील एका देवदूताने १५ किलोमीटर पायी जाऊन स्वखर्चाने औषधाचा साठा नेत शेकडो रुग्णांचे जीव वाचवले आहे.

बुलढाणा जिल्ह्यातील मध्यप्रदेशच्या सीमेवर असलेल्या गोमाल या आदिवासी गावात गेल्या आठवडाभरापासून अतिसाराची लागण झाली आहे. गावातील तीन रुग्णांना अतिसाराची लागण



झाल्यानंतर रस्ता नसल्याने वेळेत उपचार मिळू शकला नाही आणि त्यामुळे तीन रुग्णांना जीव गमवावा लागला. तर अद्यापही गोमाल या गावात अनेक लहान मुलांना अतिसाराची लागण झाल्याचे दिसून येत आहे सध्या ६८ रुग्ण अतिसराने गंभीर असून अनेकांना गावात उपचार सुरू आहेत. या प्रकरणाची आरोग्य प्रशासनाने दखल घेतली नसली तरी जळगाव जामोद येथील एका डॉक्टरांनी या रुग्णांची दखल घेत उपचार सुरु केले आहेत.

हा देवदूत आहे डॉ. संदीप वाकेकर. डॉ. संदीप वाकेकर हे गेल्या अनेक वर्षांपासून जळगाव जामोद येथे बालरोग तज्ञ म्हणून आपला खाजगी वैद्यकीय व्यवसाय करतात. मात्र गोमाल गावात अतिसाराने अनेक रुग्ण बाधित झाल्याचे माहिती पडताच त्यांनी आपल्या सहकार्यांना सोबत घेत १५ किलोमीटर डोक्यावर औषधीचा साठा घेत खडतर प्रवास करत गोमाल गाव गाठले.

डॉ. संदीप वाकेकर यांनी गेले तीन दिवस गोमाल गावात रात्रंदिवस शेकडो रुग्णांवर उपचार करत या रुग्णांचा जीव वाचवला आहे. खरंतर जे काम प्रशासनाने करायला हवं ते काम अतिशय दुर्गम अशा पाड्यावर जाऊन या देवदूत डॉक्टरांनी स्व खर्चाने केले आहे. डॉ. संदीप वाकेकर यांच्या या कामाचे सर्वत्र कौतुक होत आहे.